# औरंगाबाद महानगरपलिका, औरंगाबाद

☎: 2333536-40, 2348001-05 (P.B.X.), 2331281, 2331283
Fax : (0240) - 2331213


जा.क्र./मनपा/भांडार/2022/32 दिनांक :- 01 /06/2022

## दरपत्रक सुचना

प्रति,

--------------------

--------------------

--------------------

**विषय :-** खालील नमुद केल्यानुसार दरपत्रक सादर करणे बाबत.

वरिलप्रमाणे आपणास कळविण्यात येते की, महानगरपालिका, औरंगाबाद यांना खाली नमुद केल्यानुसार व दिलेल्या विवरणानुसार/प्रत्यक्ष दिलेल्या सुचनेनुसार साहित्य खरेदी करणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | दर सर्व करांसाहित प्रती नग |
|---|---|---|
| 1 | स्वयं नळ जोडणी घोषणापत्र छपाई (सोबत दिलेल्या नमुन्यानुसार) | |

सदर साहित्याचे दरपत्रक सिलबंद करुन दिनांक 3 /06/2022 पर्यंत भांडार विभागात सादर करावे. वेळेच्या आत न आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच आपणास प्रत्यक्ष दिलेल्या सुचनेनुसार/आदेशानुसार साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

**भांडार अधिक्षक (अ.का.)**
**महानगरपालिका, औरंगाबाद**

**प्रत :-**

**1. मा.उप आयुक्त तथा विभाग प्रमुख, महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.**
**2. संगणक विभाग प्रमुख, महानगरपालिका, औरंगाबाद यांना पोर्टलवर प्रसिध्दीसाठी सादर.**

अनुक्रमांक ...... 43304

किंमत रू.१०/-

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

## पाणी पुरवठा विभाग

## अभय योजना

## स्वयं नळ जोडणी घोषणापत्र

# अभय योजना

## नळ जोडणी बाबत स्वयं घोषणापत्र :- मालमत्ताधारकाने / भोगवटादाराने भरावयाची माहिती

(प्रपत्र १ व करारनामा)

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

प्रपत्र १

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची 'ड' चे प्रकरण १० नुसार पाणी पुरवठ्यासाठीचा अर्ज)

०१. नळ जोडणी घेतलेल्या, मालमत्ताधारकाचे नांव :- ..........................................

भोगवटाधारकाचे नांव :- ..........................................

०२. इमारतीचे नांव :- ...................... ०३. मोहल्ला :- ......................

०४. पूर्वीचा घर क्र. :- ...................... ०५. नभुक्र./स.नं./गट नं. इत्यादी :- ............

०६. इमारतीचा वापर सुरू झाल्याचा दिनांक किंवा ..........................................

बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्राचा क्र व तारीख :- ..........................................

०७. पूर्वीची नळजोडणी असल्यास त्याचा क्र. :- .........

०८. पाणीपट्टी भरल्याचा पावती क्र. व दि. .........

०९. (अ) इमारत पूर्णतः नविन आहे काय? होय / नाही (ब) अंशतः नविन आहे काय? होय / नाही

१०. इमारतीचे स्थान ...... मी. मुख्य रस्त्यावर / ...... मी. रस्त्यापासून दूर (सोबतच्या स्थळ दर्शक नकाशा प्रमाणे)

११. घरामध्ये असलेल्या नळ जोडणीचा वापर :- जो वापर असेल त्यावर (√) अशी खुण करावी.

**पाणी वापराचा प्रकार** :- ०१. निवासी ( ) ०२. व्यावसायीक ( )

१२. विद्युत पूरवठा आहे काय? होय / नाही (असल्यास पूरावा म्हणून विज देयकाची प्रत जोडावी)

१३. वापराप्रमाणे भरावयाच्या पाणीपट्टी रक्कमेची माहिती :- सोबत दिलेल्या जाहीर आवाहना मधील तक्त्याचा वापर करावा.

**नळ वापराचा प्रकार** :- निवासी / व्यावसायीक नुसार ..... इंच व्यासासाठी खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| दंडाची रक्कम :- | रू. ............ |
| रस्ता दूरूस्ती व बोरींग शुल्क | रू. ............ |
| चालु वर्षाची पाणीपट्टी | रू. ............ |
| एकूण रक्कम | रू. ............ |

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

प्रमाणित करतो की, सदर प्रपत्रात दिलेली माहिती सत्य असून ती माझ्या माहितीप्रमाणे/आकलनाप्रमाणे खरी आहे जर त्यात कोणत्याही प्रकारचा खोटेपणा आढळुन आला तर माझ्यावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १० चे नियम १६ व १८ तसेच भारतीय दंड प्रक्रीया संहिता १९७३ कलम १४५ ते १४८ व आय.पी.सी.३७९ नुसार गुन्हा दाखल करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

माहिती भरून देणाऱ्याची स्वाक्षरी व नांव :- ....................................

....................................

मालक आहे काय? होय / नाही          भाडेकरू आहे काय? होय / नाही

सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी :- (१) मालकीहक्काचे सर्व प्रकारचे दस्तऐवज (२) मंजुर रेखांकन आदेश (३) बांधकाम परवानगी व नकाशा (४) बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र. (५) मालमत्ता करांची पावती (६) विद्युत देयकाची प्रत

टिप :- काही अडचण / शंका असल्यास अधिक माहिती/मार्गदर्शनासाठी संबंधित वॉर्डाचे उप अभियंता (पाणी पुरवठा) यांच्या कार्यालयाशी किंवा संबंधित कर्मचाऱ्याशी संपर्क साधावा.

## जाहीर आवाहन

### अनाधिकृत नळ जोडणी अभय योजने अंतर्गत नियमित करणे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, ज्या नागरीकांकडे अनाधिकृत नळ असतील किंवा ज्या नागरीकांचे घरगुती वापरासाठी नळ कनेक्शन मंजूर असेल परंतु त्या नळाच्या पाण्याचा वापर व्यावसायीक वापरकरीता करीत असतील अशा नागरीकांनी ती नळ जोडणी खालील प्रमाणे दंड भरून अभय योजने अंतर्गत नियमित करून घ्यावी. तसेच ज्या नागरीकांनी मुख्य जलवाहीनीवर, **Rising Main** (टाकी भरणा करणारी मुख्य जलवाहीनी) जलवाहीनीवर नळजोडण्या निदर्शनास आल्यास अशा नागरीकांच्या नळजोडण्या बलपूर्वक खंडीत करण्यात येतील व या नळजोडण्या कुठल्याही परिस्थितीत अभय योजनेत नियमित करण्यात येणार नाहीत. अशा नळ जोडण्या नागरीकांनी स्वतःहुन काढुन घ्याव्यात. वर नमूद जलवाहीनीवर (मुख्य जलवाहीनीवर/ **Rising Main** वर) नळजोडणी आढळल्यास अशा नागरीकांविरूध्द त्या-त्या भागाशी संबंधित पोलीस ठाण्यात महानगरपालिकेतर्फे पाणी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात (FIR) येईल.

**अभय योजने अंतर्गत अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करणेसाठी दिनांक ३१/०७/२०११ पर्यंत पुढील प्रमाणे शुल्क आकारण्यात येत येईल.**

| अ.क्र. | नळाचा वापर | नळाचा व्यास | दंडाची रक्कम | रस्ता दूरूस्ती व बोरींग शुल्क | चालु वर्षाची पाणीपट्टी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घरगुती | १५ मी.मी. (१/२ इंच) | १०००/- | २६०/- | १८००/- | ३०६०/- |
| | | २० मी.मी. (३/४ इंच) | २०००/- | २६०/- | २९२५/- | ५१८५/- |
| | | २५ मी.मी. (१ इंच) | ३०००/- | २६०/- | ६८२५/- | १०,०८५/- |
| २ | व्यावसायीक (वितरण व्यवस्थेवरील) | १५ मी.मी. (१/२ इंच) | ४०००/- | २६०/- | ६५००/- | १०,७६०/- |
| | | २० मी.मी. (३/४ इंच) | ५०००/- | २६०/- | १२,०००/- | १७,२६०/- |
| | | २५ मी.मी. (१ इंच) | ६०००/- | २६०/- | २५,०००/- | ३१,२६०/- |

उपरोक्त नुसार दि.३१-०७-२०११ पर्यंत नागरीकांनी दंडासह नळजोडणी नियमित करून न घेतल्यास संबंधितांची अनधिकृत नळजोडणी बलपूर्वक खंडीत करून अशा नागरीकांविरूध्द पोलीस ठाण्यात पाणी चोरीचा गुन्हा (FIR) दाखल करण्यात येईल.

तरी शहरातील सर्व अनधिकृत नळधारकांनी याची नोंद घ्यावी व आपापले अनधिकृत नळ अधिकृत करून घेऊन योजनेचा लाभ घ्यावा.

डॉ.पुरूषोत्तम भापकर
आयुक्त
महानगरपालिका, औरंगाबाद

# पाणी पूरवठा नळ जोडणीसाठी मागणी असल्यास अर्जदाराने करावयाचा "करारनामा"

रू.२०/- चा कोर्ट फी स्टॅम्प जोडावा.

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १३ मधील कलम १९८, २००, प्रकरण ११ मधील कलम १३४, १३५, १३६ आणि अनुसूचि 'ड' चे प्रकरण १० अन्वये. )

०१. करारनामा करण्यात येतो की, मी श्री/श्रीमती .................................................., रा.म्यु.घर क्र./नभुक. .............. मोहल्ला ....................................... औरंगाबाद येथे रहात असून मी औरंगाबाद महानगरपालिकेकडे पिण्याचे पाणीसाठी नळ जोडणी (........इंच व्यासासाठी) करीता केलेला अर्ज मनपाने मंजुर केल्यास मला खालील अटी शर्ती बंधनकारक राहतील.

०२. माझे स्वतःचे/कब्जाचे/भाड्याचे म्यु.घर क्र. /नभुक. ............. मोहल्ला ................................ याठिकाणी आहे. सदरहु घरात मी ..............इंच व्यासाची पाण्याची नळ जोडणी घेतली आहे. पाणी घरगुती वापरासाठी/उद्योगधंदासाठी उपयोगात आणण्यात येत आहे. त्यात कोणताही फेरबदल करणार नाही.

०३. पाणी पूरवठा उपविधी क्र.२७ प्रमाणे सर्व बाबी नकाशामध्ये दर्शविण्यात आलेल्या आहेत.

०४. पाणी पूरवठा जो पर्यंत माझ्या जागेत घरात सुरू आहे, तोपर्यंत पाणी पूरवठा असलेले सर्व नियम व उपविधी तसेच अस्तित्वात येणाऱ्या नियमांची मी अंमलबजावणी करीन.

०५. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे किंवा तत्संबंधि किंवा उपविधीच्या विरूध्द वर्तन केल्यास पाण्याची जोडणी रद्द किंवा बंद केली तर माझी कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

०६. कार्यकारी अभियंता, उप अभियंता (पाणी पुरवठा), कनिष्ठ अभियंता, दुय्यम आवेक्षक किंवा महानगरपालिकेच्या अधिकृत प्रतिनिधी यांना नळ कनेक्शन तपासण्यासाठी सुर्योदयानंतर व सुर्यास्तापूर्वी किंवा पाणी पूरवठ्याचेवेळे मध्ये परवानगी देण्यात येईल. महानगरपालिका वेळोवेळी ठरविल त्या दरानुसार पाणीपट्टीचा भरणा करण्यात येईल. महानगरपालिकेने वेळोवेळीचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३४ अन्वये वाढविलेले पाणीपट्टीचे दर मला मंजूर राहतील त्याबाबत माझा उजर राहणार नाही.

०७. पाणी पूरवठा उपविधी मध्ये असलेल्या तरतुदीनुसार आणि मान्यता प्राप्त कनेक्शन व्यतिरिक्त नळाचे पाणी परवानगी शिवाय वापरणार नाही, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०० अन्वये पाण्याचा गैरवापर करणार नाही अथवा माझ्या कुटूंबातील व्यक्ती शिवाय इतर कोणासही पाणी वापरू देणार नाही. तसेच कनेक्शन मध्ये वाढ किंवा कोणत्याही स्वरूपाचा बदल महानगरपालिकेच्या पूर्व परवानगी शिवाय करणार नाही.

०८. ज्यामुळे सार्वजनिक आरोग्यास धोका होण्याचा संभव आहे असे घाण पाणी काढून देण्याची जबाबदारी माझ्यावर राहील.

०९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण १० चे नियम १३ अन्वये मीटर, मीटर बॉक्स किंवा इतर साहित्य जे माझ्या नळ कनेक्शनच्या संबंधित आहेत त्याच्या नुकसानी करीता, चोरी करीता मी सर्वस्वी जबाबदार राहील व काही नुकसान वगैरे झाल्यास त्याची भरपाई करील.

१०. माझ्याकडे जी नळ जोडणी आहे त्याबाबत काही तांत्रिक, कायदेशीर अडचण उद्‌भवल्यास महानगरपालिकेने माझी नळ जोडणी बंद/खंडीत केल्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

११. जर मी महानगरपालिकेच्या कोणत्याही नियमावली विरूध्द वर्तन केल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २६ मधील कलम ४३३ अन्वये माझ्यावर गुन्हा करण्यात येईल, याची मला कल्पना आहे.

१२. महानगरपालिकेच्या नळातुन पाणी पूरवठा काही तांत्रिक अडचणीमुळे कमी झाल्यास याबाबत माझी कोणत्याही प्रकारची तक्रार राहणार नाही.

१३. महानगरपालिकेने पाणी पूरवठ्यात सुधारणा करण्यासाठी अस्तित्वात असलेली जलवाहीनी बंद केली (ज्यावर माझे नळ कनेक्शन असेल) व दुसरी जलवाहीनी (टाकली) सुरू केली तर महानगरपालिकेच्या परवानगी व स्वःखर्चाने मी नळ जोडणी, नविन जलवाहीनीवर बदलुन घेईल.

१४. मला वरील सर्व अटी मान्य असून माझ्या नळ कनेक्शन बाबत कोणतीही अनियमितता आढळुन आल्यास माझे नळ कनेक्शन बंद केल्यास माझी काहीही हरकत राहणार नाही.

१५. नळ जोडणी अधिकृत झाल्याच्या तारखेपासून दोन दिवसाचे आत वॉर्ड कार्यालयात आवश्यक ती रक्कम भरीन. अन्यथा माझ्यावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १० चे नियम १६ व १८ तसेच ४३३ प्रमाणे होणाऱ्या कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील, याची मला कल्पना आहे.

करारनामा लिहुन देणार : अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी ..........................................................

करारनामा लिहुन घेणार : उप अभियंता (पाणी पूरवठा), महानगरपालिका, औरंगाबाद नांव व स्वाक्षरी ..............................

साक्षीदार :-

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | नांव :- ...................................... | ०२. | नांव :- ...................................... |
| | पत्ता :- ...................................... | | पत्ता :- ...................................... |
| | स्वाक्षरी :- ...................................... | | स्वाक्षरी :- ...................................... |

## स्थळ दर्शक नकाशा

अर्जदाराची स्वाक्षरी

## कार्यालयीन उपयोगासाठी

उपरोक्त अर्जातील माहितीची तपासणी केली. मान्यता देण्यात येत आहे.

दुय्यम आवेक्षक　　　　कनिष्ठ /शाखा/सहा. अभियंता　　　　उप अभियंता

फॉर्म क्र.......................

# कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद

## (पाणीपुरवठा विभाग)

प्रकरण क्र...................

## नळाच्या मंजूरबाबत अर्जदारास सुचना पत्र

अर्जदाराचे पुर्ण नांव ______________________ घर क्र./प्लॉट नं. __________

वार्ड नं. __________ मोहल्ला __________ आपला अर्ज क्र. __________ तारीख __________

अनुसार वर दर्शविलेल्या इमारत/प्लॉट करिता, खालील प्रमाणे विभागीय कार्यालय क्र.(   ) येथे रक्कम भरल्या नंतर __________ व्यासाचे १) तात्पुरते नळ कनेक्शन २) तात्पुरत्या नळाचे कायम नळात रुपांतर ३) नविन घरगुती कायम नळ कनेक्शन ४) अतिरिक्त घरगुती नळ कनेक्शन ५) उपयोग धंद्यासाठी नविन कायम नळ कनेक्शन ६) उद्योग धंद्यासाठी अतिरिक्त नळ कनेक्शन घरगुती/व्यवसायिक वापरासाठी काम करणेस श्री ______________________ परवाना धारक प्लंबर, परवाना क्र. __________ यांचे मार्फत करुन घेण्यास खालील अटीवर मंजूर देण्यात येत आहे.

**रकमेचा तपशील :** रुपये

१) बोरींग चार्जेस घरगुती / व्यावसायिक : __________

२) रस्ता दुरुस्ती चार्जेस : __________

३) अनामत रक्कम (पा.पु. बिलापोटी) : __________

४) तपासणी शुल्क : __________

५) नविन जलवाहिनी आवश्यक असल्यास त्याचा किंवा इतर खर्च : __________

एकूण रुपये : __________

अटी :-

१) वरील दर्शविलेली रक्कम कार्यालयात जमा झाल्यानंतर जोडणी करण्यात यावी.

२) प्रत्यक्ष नळ जौडणी वेळी आवश्यक त्या व्यासाचे सी.आय.सॅडल पिस व फेऱ्युल वापरण्यात यावे.

३) नळासाठी फक्त आय.ए.आय. मार्कची जी.आय.पाईपच वापरण्यात यावेत इतर प्रकारचे पाईप वापरल्यास कनेक्शन अनधिकृत समजले जाईल.

४) जोडणीचे काम महानगरपालिकेच्या दुय्यम अवेक्षक/कनिष्ठ अभियंता यांचे समक्ष तसेच दिवसा करण्यात यावे. दुय्यम अवेक्षक / कनिष्ठ अभियंता यांचे अनुपस्थितीत केलेली नळ जोडणी अनधिकृत समजण्यात येईल.

५) कामाबाबतची तांत्रिक जबाबदारी स्वाक्षरी करणाऱ्या परवाना धारक प्लंबरची राहील.

६) कार्यालयाची मंजुरी व रक्कम भरल्याशिवाय जोडणी केल्यास ती अनधिकृत ठरते, अशी पुर्व परवानगी शिवाय केलेली जोडणी आढळून आल्यास अशी जोडणी पुर्व सुचना न देता बंद करण्यात येईल व घरमालक व जोडणी करणाऱ्या प्लंबरवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

७) कृपया वरील बाबी लक्षात घेवून कार्यालयाचे नियमानुसार काम करावे व म.न.पा.स सहकार्य करावे.

८) नळ मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत वर दर्शविलेली रक्कम विभागीय कार्यालयात भरुन नळ जोडणी घ्यावी लागेल अन्यथा ही परवानगी आपोआप् रद्द होईल. त्यानंतर अर्जदारास पुन्हा नळ जोडणीसाठी नव्याने अर्ज कराव लागेल.

मा. कार्यकारी अभियंता यांची मंजूर दि. ........................ नुसार

उप अभियंता (पाणी पुरवठा)
महानगरपलिका औरंगाबाद

प्रतिलिपी :-

१) मा. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्वत सादर.

२) विभागीय अधिकारी, विभाग क्र. (      ) महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव देण्यात येते.

३) अर्जदा श्री. ______________________ यांना माहितीस्तव देण्यात येते

४) प्लंबर श्री. ______________________ यांना माहितीस्तव देण्यात येते.

उप अभियंता (पाणी पुरवठा)
महानगरपलिका औरंगाबाद

* लागू नसेल ते खोडावे

फॉर्म क्र........................

# कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद

## (पाणीपुरवठा विभाग)

## नळाच्या मंजूरबाबत अर्जदारास सुचना पत्र

प्रकरण क्र....................

अर्जदाराचे पुर्ण नांव ______ घर क्र./प्लॉट नं. ______
वार्ड नं. ______ मोहल्ला ______ आपला अर्ज क्र. ______ तारीख ______
अनुसार वर दर्शविलेल्या इमारत/प्लॉट करिता, खालील प्रमाणे विभागीय कार्यालय क्र.( ) येथे रक्कम भरल्या नंतर ______ व्यासाचे १) तात्पुरते नळ कनेक्शन २) तात्पुरत्या नळाचे कायम नळात रुपांतर ३) नविन घरगुती कायम नळ कनेक्शन ४) अतिरिक्त घरगुती नळ कनेक्शन ५) उपयोग धंद्यासाठी नविन कायम नळ कनेक्शन ६) उद्योग धंद्यासाठी अतिरिक्त नळ कनेक्शन घरगुती/व्यवसायिक वापरासाठी काम करणेस श्री ______ परवाना धारक प्लंबर, परवाना क्र. ______ यांचे मार्फत करून घेण्यास खालील अटीवर मंजूर देण्यात येत आहे.

**रकमेचा तपशील :**

| | रुपये |
|---|---|
| १) बोरींग चार्जेस घरगुती / व्यावसायिक | : ______ |
| २) रस्ता दुरुस्ती चार्जेस | : ______ |
| ३) अनामत रक्कम (पा.पु. बिलापोटी) | : ______ |
| ४) तपासणी शुल्क | : ______ |
| ५) नविन जलवाहिनी आवश्यक असल्यास त्याचा किंवा इतर खर्च | : ______ |
| एकूण रुपये | : ______ |

**अटी :**

१) वरील दर्शविलेली रक्कम कार्यालयात जमा झाल्यानंतर जोडणी करण्यात यावी.
२) प्रत्यक्ष नळ जोडणी वेळी आवश्यक त्या व्यासाचे सी.आय.सॅडल पिस व फेन्युल वापरण्यात यावे.
३) नळासाठी फक्त आय.ए.आय. मार्कची जी.आय.पाईपच वापरण्यात यावेत इतर प्रकारचे पाईप वापरल्यास कनेक्शन अनधिकृत समजले जाईल.
४) जोडणीचे काम महानगरपालिकेच्या दुय्यम अवेक्षक/कनिष्ठ अभियंता यांचे समक्ष तसेच दिवसा करण्यात यावे, दुय्यम अवेक्षक / कनिष्ठ अभियंता यांचे अनुपस्थितीत केलेली नळ जोडणी अनधिकृत समजण्यात येईल.
५) कामाबाबतची तांत्रिक जबाबदारी स्वाक्षरी करणाऱ्या परवाना धारक प्लंबरची राहील.
६) कार्यालयाची मंजुरी व रक्कम भरल्याशिवाय जोडणी केल्यास ती अनधिकृत ठरते, अशी पुर्व परवानगी शिवाय केलेली जोडणी आढळून आल्यास अशी जोडणी पुर्व सुचना न देता बंद करण्यात येईल व घरमालक व जोडणी करणाऱ्या प्लंबरवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
७) कृपया वरील बाबी लक्षात घेवून कार्यालयाचे नियमानुसार काम करावे व म.न.पा.स सहकार्य करावे.
८) नळ मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत वर दर्शविलेली रक्कम विभागीय कार्यालयात भरुन नळ जोडणी घ्यावी लागेल अन्यथा ही परवानगी आपोआप रद्द होईल. त्यानंतर अर्जदारास पुन्हा नळ जोडणीसाठी नव्याने अर्ज कराव लागेल.

मा. कार्यकारी अभियंता यांची मंजूर दि. ........................ नुसार

उप अभियंता (पाणी पुरवठा)
महानगरपलिका औरंगाबाद

**प्रतिलिपी :-**

१) मा. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्वत सादर.
२) विभागीय अधिकारी, विभाग क्र. ( ) महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव देण्यात येते.
३) अर्जदा श्री. ______ – यांना माहितीस्तव देण्यात येते
४) प्लंबर श्री. ______ यांना माहितीस्तव देण्यात येते.

उप अभियंता (पाणी पुरवठा)
महानगरपलिका औरंगाबाद

* लागू नसेल ते खोडावे